# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


# महाराष्ट्र वन सेवा पूर्व परीक्षा - २०१९

**क्रमांक :एडीव्ही ३११९/सीआर-६०/२०१८/तीन** **जाहिरात क्रमांक : ०४/२०१९**

शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अखत्यारितील खालील संवर्गातील एकूण **१००** पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **महाराष्ट्र वन सेवा पूर्व परीक्षा - २०१९, रविवार, दिनांक २६ मे, २०१९** रोजी मुंबई, औरंगाबाद, नागपूर व पुणे जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. व शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(१) सहायक वन संरक्षक, गट-अ (एकूण २९ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ४ | -- | -- | १ | १+१* | १ | २ | १+१* | ५ | ३ | २० | ९ | २९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | -- | -- | १ | १ | १ | १ | १ | ४ | २ | १४ | ५ | १९ |
| महिला | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ९ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(२) वनक्षेत्रपाल, गट-ब (एकूण ७१ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ५+५* | ५ | १ | १* | ८ | २+१* | १०+४* | २ | ११ | ७ | ६२ | ९ | ७१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | ३ | १ | १ | ६ | २ | ८ | १ | ६ | ५ | ३८ | ३ | ४१ |
| महिला | ३ | २ | -- | -- | २ | १ | ४ | १ | ३ | २ | १८ | ३ | २१ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| वनशास्त्र पदवीधारक | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |

*** अनुशेषाची पदे**

**२.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३.** पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षा दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ रोजी किंवा त्यानंतर आयोजित होण्याची शक्यता आहे .

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**४.१** वर नमूद केलेल्या संवर्गातील पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्या व आरक्षणात बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल.

**४.२** पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील व अशा सुधारित/अतिरिक्त मागणीपत्रांचा तपशील मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४.३** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे (महिला, खेळाडू, इत्यादी) उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर व पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची तसेच विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

**४.४** महिला, खेळाडू, अनाथ तसेच वनशास्त्र पदवीधारकांकरीता असलेले समांतर आरक्षण कप्पीकृत (Compartmentalised) आहे.

**४.५** महिला, खेळाडू, अनाथ तसेच वनशास्त्र पदवीधारकांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.६** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.७** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**४.८** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गाच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**४.९** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गाकरीता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) आरक्षणाकरीता ग्राहय धरण्यात येतील.

**४.१० आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.**

**४.१०** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**४.११** प्राविण्य पात्र खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले क्रीडा प्रमाणपत्र तसेच त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य दर्जाची असल्याबाबत व तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या क्रीडा पडताळणीबाबतचा संबंधित विभागीय उपसंचालकांचा अहवाल पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा अथवा तत्पूर्वीचा असणे आवश्यक आहे.

**४.१२** क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो याविषयी पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे अथवा तत्पूर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले क्रीडा पडताळणीबाबतचे प्रमाणपत्र सादर केले तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**४.१३** संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासाठी त्यांना पात्र ठरवणारी आपली खेळाडू विषयक **सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी** सादर करणे आवश्यक आहे.

**४.१४** शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एफटीआर १५/०४/प्र.क्र. १३६/ फ-४, दिनांक १० फेब्रुवारी, २००९ नुसार प्रस्तुत पदांवर नियुक्तीसाठी विकलांग उमेदवार पात्र नाहीत.

**४.१५** अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**४.१६** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर, मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांचा अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावर शिफारशीकरीता विचार करण्यात येणार नाही.

**४.१७** अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ आरक्षित प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**४.१८** प्रस्तुत भरतीकरीता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" तसेच तद्नंतर यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.१९** मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्रमांक २०५३/२०१४ तसेच, जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ प्रकरणी होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**५. वेतनश्रेणी :-** **(१) गट-अ** - रूपये ९,३००-३४,८०० (ग्रेड पे- ५,०००) अधिक नियमांनुसार भत्ते.

**(२) गट-ब** - रूपये ९,३००-३४,८०० (ग्रेड पे- ४,४००) अधिक नियमांनुसार भत्ते.

**(३)** वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**६. पात्रता :-**

**६.१** भारतीय नागरिकत्व

**६.२ वयोमर्यादा :-**

| अ. क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान अमागास / मागासवर्गीय | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार | अनाथ |
| | | | | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | | |
| १ | सहायक वनसंरक्षक | १ जुलै, २०१९ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | अपात्र | ३८ |
| २ | वनक्षेत्रपाल | १ जुलै, २०१९ | २१ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | अपात्र | ३८ |

**६.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**६.४ शैक्षणिक अर्हता :-**

**६.४.१ सहायक वनसंरक्षक पदाकरीता :-**

**(अ)** खालील विषयांपैकी कमीत कमी एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी :-

**(१)** वनस्पतीशास्त्र **(२)** रसायनशास्त्र **(३)** वनशास्त्र **(४)** भूशास्त्र **(५)** गणित **(६)** भौतिकशास्त्र **(७)** सांख्यिकी **(८)** प्राणिशास्त्र **(९)**उद्यानविद्या **(१०)** पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र किंवा

**(ब)** कृषि, अभियांत्रिकी यातील स्नातक पदवीधर

**६.४.२ वनक्षेत्रपाल पदाकरीता:-**

(१) वनस्पतीशास्त्र,रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषिशास्त्र, कृषि अभियांत्रिकी,रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विदयुत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक ॲप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विदयापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा

(२) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक.

(३) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक उमेदवाराने विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(४) शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक एफएसटी-०२/१५/प्र.क्र.४६/फ-४, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ नुसार इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलि कम्युनिकेशन अभियांत्रिकी तसेच संगणक विज्ञान व तंत्रज्ञान अभियांत्रिकी अशी अर्हता धारण करणारे उमेदवार वनक्षेत्रपाल पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

**६.४.३ वनक्षेत्रपाल पदाकरीता वनशास्त्र पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद परिच्छेद क्रमांक ६.४.२ मध्ये नमूद अर्हता धारकामधून भरण्यात येईल.**

**६.४.४** सहायक वनसंरक्षक तसेच वनक्षेत्रपाल पदासाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता आढळून न आल्यास त्याच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

**६.४.५** पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**६.४.६** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**६.५ शारीरिक मानके -**

**६.५.१ खालीलप्रमाणे शारीरिक पात्रता पूर्ण केलेली असावी :-**

(१) अनुसूचित जमाती व्यतिरिक्त अन्य उमेदवार -

| **अ.क्र.** | **पात्रता** | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|---|
| १. | उंची | १५० सें.मी.पेक्षा कमी नसावी | १६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| २. | छाती | -- | (१ ) न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी<br>(२) न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. |

(२) अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार —

| **अ.क्र.** | **पात्रता** | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|---|
| १. | उंची | १४५ सें.मी.पेक्षा कमी नसावी | १५२.५ सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| २. | छाती | -- | (१ ) न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी<br>(२) न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. |

**६.५.२** सुधारणेनंतर (आफ्टर करेक्शन) + 4.00 D सह प्रत्येक डोळयाची दृष्टीतीक्ष्णता (व्हिज्युअल ॲक्विटी ) ६/६ असावी. बाहय डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

**६.५.३** सहायक वनसंरक्षक, गट-अ पदाकरीता पुरुष व महिला उमेदवारामध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १४ कि.मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे. तसेच, वनक्षेत्रपाल, गट-ब पदाकरीता पुरुष व महिला उमेदवारामध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १६ कि.मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे.

**६.५.४** प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. तसेच वैदयकीय चाचण्या घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास व वैदयकीय चाचणीमध्ये पात्र न ठरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**७. परिविक्षाधीन कालावधी व प्रशिक्षण :-**

**७.१** सहायक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल पदाकरीता परिविक्षाधीन कालावधी ३ वर्षांचा असेल.

**७.२** सहायक वनसंरक्षकांच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमाचा २ वर्षांचा कालावधी व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निश्चित केल्याप्रमाणे १ वर्ष क्षेत्रीय प्रशिक्षणाचा समावेश असेल.

**७.३** वनक्षेत्रपाल पदावर नियुक्त उमेदवाराने केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या वनशास्त्र प्रशिक्षण महाविदयालयातील दीड वर्ष कालावधीचे प्रशिक्षण तसेच प्रधान मुख्य वन संरक्षक किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी विहित केलेले दीड वर्षाचे क्षेत्रीय प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे व विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

**७.४** विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा उमेदवार सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

**७.५** विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सहायक वनसंरक्षक व वनक्षेत्रपालांच्या नियुक्तीची परस्पर जेष्ठता आयोगाने घेतलेल्या परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे उमेदवाराने मिळवलेले गुण व प्रशिक्षण पाठयक्रमाच्या शेवटी घेण्यात येणा-या अंतिम परीक्षेत मिळविलेले गुण एकत्रित करुन निर्धारित केली जाईल.

**७.६** प्रशिक्षण कालावधीमध्ये शासनाने निश्चित केलेल्या दराने विदयावेतन देण्यात येईल.

**८. बंधपत्र :-**

**८.१** निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीनंतर विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यावर सदर पदावर किमान ७ वर्ष सेवा पूर्ण करावी लागेल.

८.२ विहित प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा विहित किमान ७ वर्ष कालावधीची सेवा पूर्ण न केल्यास, प्रशिक्षणावरील खर्चासाठी शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करावी लागेल.

८.३ याबाबतची संबंधित बंधपत्रे उमेदवारास नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहतील.

**९. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

९.१ नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

९.१.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

९.१.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

९.१.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**१०. परीक्षेचे टप्पे - तीन**

१०.१ प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यामध्ये घेण्यात येईल :-

(१) पूर्व परीक्षा - १०० गुण (२) मुख्य परीक्षा - ४०० गुण (३) मुलाखत - ५० गुण

**११. प्रमाणपत्र पडताळणी:-**

११.१ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

११.२ विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

११.३ वरीलप्रमाणे मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

**१२. शुल्क रुपये : १२.१ :-** अमागास - **३७४/-** १२.२ :- मागासवर्गीय - **२७४/-**

**१३. अर्ज करण्याची पद्धत :-**

१३.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

१३.२ पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ८ मार्च, २०१९ ते २८ मार्च, २०१९** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

१३.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१३.४ आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

१३.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

१३.६ आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१३.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

१३.७.१ शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक करावे.

१३.७.२ **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर **'माझे अप्लिकेशन'** सदरातील **'स्पर्धात्मक परीक्षा'**या लिंक वर क्लिक करावे.

१३.७.३ **'स्पर्धात्मक परीक्षा'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' **लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर** ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

१३.७.४ 'Pay Now ' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

१३.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

१३.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. **सदर** कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१३.७.७चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

१३.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१३.७.९ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २८ मार्च, २०१९ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे.

१३.७.१० चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २९ मार्च, २०१९** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

१३.७.११ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**१३.८ केंद्र निवड :-**

**१३.८.१** परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरीता "माझे खाते" मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

**१३.८.२** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल, तर सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करता येईल.

**१३.८.३** वरीलप्रमाणे केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**१३.८.४** केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**१४. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१४.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१४.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१४.३** **ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड व स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची उमेदवाराचे छायाचित्र व इतर मजकूर सुस्पष्टपणे दिसेल अशी छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.** मूळ ओळखपत्राच्या पुराव्याऐवजी केवळ त्याच्या छायांकित प्रती अथवा कलर झेरॉक्स अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा ओळखीचा पुरावा सादर केल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व उमेदवारास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल.

**१४.४** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट प्रतीमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१४.५** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१५. परीक्षेस प्रवेश**

**१५.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व ओळखीच्या पुराव्याची सुस्पष्ट छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

**१५.२** स्मार्ट वॉच, डिजीटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**१५.३** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१६. बायोमॅट्रिक पडताळणी :**

**१६.१** निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रिक सत्यापनासाठी **(Genuiness)** डिजिटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटांचे ठसे आणि/अथवा बुब्बुळाच्या आधारे पडताळणी केली जाईल.

**१६.२** बायोमॅट्रिक पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी त्यांच्या बोटांचे ठसे योग्यरित्या स्वीकारले गेले असल्याची खात्री करावी.

**१६.३** बायोमॅट्रिक पडताळणीवेळी विसंगती आढळून आल्यास उमेदवारी नाकारली जावू शकते. तसेच पडताळणीच्यावेळी उमेदवार अस्सल नसल्याचे **(not genuine)** आढळून आल्यास त्याच्यावरील कायदेशीर कारवाईव्यतिरिक्त उमेदवारी रद्द होवू शकते, शिवाय आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधाची कारवाई होवू शकते.

**१६.४** परीक्षेच्यावेळी बायोमॅट्रिक पडताळणीकरीता अडचण निर्माण होवून परीक्षेस प्रवेश नाकारला जावू नये, याची उमेदवाराने स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याकरीता परीक्षेच्या दिवशी उमेदवाराने हातावर मेहंदी, शाई, रसायन इत्यादी प्रकारची कोणतीही बाहयवस्तू/पदार्थ लावू नये.

**१६.५** उमेदवारांनी आधार क्रमांक त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्यास त्यांचे परीक्षेच्या वेळी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा परीक्षा / मुलाखतीकरीता उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

१७. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षेची योजना**" विभागातील '**महाराष्ट्र वन सेवा परीक्षा**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

१८. प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१९. सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : ८ मार्च, २०१९

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.